तरुण भारत

# महिला शूर झाल्या तर देश महासत्ता

## डॉ. मंदाकिनी आमटे : भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. पतंगराव कदम यांच्या हस्ते भद्रकाली पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

आदिवासींसाठी काम करणे एक आव्हानच होते. मात्र भारतातील शूरवीर महिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन दवाखाना सुरू केला. आदिवासींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी बाबा आमटे यांनी हेमलकसा येथे लोकबिरादरी प्रकल्प उभा केला. प्रकाश आमटे आणि मी स्वत: ही धुरा पुढे सांभाळली. महिला शूर झाल्या तर देश महासत्ता होईल, असे प्रतिपादन हेमलकसा, लोकबिरादरी प्रकल्पाच्या माध्यमातून आदिवासी समाजासाठी वैद्यकीय व सामाजिक कार्य करणाऱ्या डॉ. मंदाकिनी आमटे यांनी केले.



कोल्हापूर : डॉ. मंदाकिनी आमटे यांना भद्रकाली ताराराणी पुरस्कार प्रदान करताना डॉ. पतंगराव कदम. सोबत प्रा. विजयमाला निकम- पाटील, डॉ. एस. एम. पवार, डॉ. प्रकाश आमटे, प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील आदी.

ताराराणी विद्यापीठातर्फे कै. डॉ. व्ही. टी. पाटील स्मृतिदिनानिमित्त भद्रकाली ताराराणी पुरस्कार हेमलकसा, लोकबिरादरीच्या प्रकल्पाच्या माध्यमातून आदिवासी समाजासाठी वैद्यकीय व सामाजिक कार्य करणाऱ्या डॉ. मंदाकिनी आमटे यांना भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. पतंगराव कदम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना त्या बोलत होत्या.

डॉ. मंदाकिनी आमटे म्हणाल्या, आदिवासी समाजाची माडिया भाषा शिकून त्यांच्याशी संवाद साधला. त्यामुळे त्यांना आमच्यातलेच लोक असल्याची खात्री पटल्यानंतर दवाखान्यात लोक येऊ लागले. त्यांच्यातील अंधश्रध्दा कमी करणे फार अवघड गोष्ट होती. वारंवार मार्गदर्शन आणि वैद्यकीय उपचाराच्या माध्यमातून आदीवासींचा विश्वास कमावला. हेमलकसा येथे शाळा सुरू केली या शाळेत सुरूवातीला २५ मुले दाखल झाली. यातीलही १० पळून गेली, १२ मुलांवरच शाळा सुरू केली. या शाळेतील पहिला विद्यार्थी सध्या डॉक्टर आहे. सध्या इंजिनिअर, डॉक्टर, पदाधिकारी, शिक्षक आदिवासी विद्यार्थी कार्यरत आहेत.

भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. पतंगराव कदम म्हणाले, आदीवासींची सेवा करण्यामध्ये आमटे कुटुंब रमले आहे. त्याग आणि सहनशिलतेचे प्रतिक म्हणजेच आमटे कुटुंब आहे.

डॉ. प्रकाश आमटे म्हणाले, आपली मानसिकता बदलून, गरजा कमी करून सामाजिक सेवा करण्यासाठी विचारचक्र सुरू होणे हीच क्रांती आहे.

प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी प्रस्ताविक केले. डॉ. तेजस्वीनी मुडेकर, अंजली साठे यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. जयसिंगराव सावंत यांनी गौरवपत्राचे वाचन केले. डॉ. नीता धुमाळ यांनी आभार मानले. यावेळी प्रा. प्राजक्त पाटील, प्रा. विजयमाला निकम- पाटील, प्रा. अशोकराव पार्वते, डॉ. एस. एम. पवार, प्रा. अॅड. प्रकाश हिलगे, बीसीयुडीचे संचालक डॉ. अर्जुन राजगे, चंद्रकांत बोंद्रे, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, प्रा. अनिल गस्ते, डॉ. सुजय पाटील विद्यार्थीनी आदी उपस्थित होते.

Scanned by CamScanner